सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू अभ्यासक्रम

(Bridge course)

इयत्ता –दहावी

विषय : इतिहास,राज्यशास्त्र व भूगोल

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

स्वच्छ भारत

एक कदम स्वच्छता की ओर





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

<u>सेतू अभ्यासक्रम (ब्रीज कोर्स)</u>

- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.

- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.

- कार्यकारी संपादक : **डॉ.नेहा बेलसरे**
  प्र.प्राचार्य ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
  डॉ.दत्तात्रय थिटे
  वरिष्ठ अधिव्याख्याता,सामाजिक शास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.

- संपादन सहाय्य : **१) बाळासाहेब गायकवाड**
  विषय सहायक,सामाजिक शास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
  २) **दीपक चांदूरे** ,अधिव्याख्याता,प्रादेशिक विद्या
  प्राधिकरण,अमरावती.
  ३) अण्णासाहेब कुटे,विषय सहायक, डाएट,हिंगोली.

- निर्मिती सदस्य :

१) **श्री.महालिंग शिवलिंग स्वामी**,शिरोली हायस्कूल,शिरोली,ता- हातकणंगले,जि-कोल्हापूर.

२)**सौ.स्मिता संजीवकुमार निटवे**,एम.जी.शहा.विद्यामंदिर व जुनियर कॉलेज,बाहुबली.ता- हातकणंगले,जि-कोल्हापूर.

३) **श्री.संजय शामराव कुरणे** ,न्यू इंग्लिश स्कूल,ज्युनिअर कॉलेज अ.लाट,ता-शिरोळ,जि-कोल्हापूर.

४) **श्री.विशाल मोरेश्वर कुलकर्णी**,शिक्षक/BOS,विब्योर हायस्कूल,उंचगाव,जि.कोल्हापूर

५) **डॉ.अण्णा गरड**, शिक्षक,इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन जि.नांदेड

विद्यार्थ्यांसाठी सूचना / विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो, मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. **या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हे उद्दिष्ट ठेवून तुमच्यासाठी हा सेतू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.**

1. सेतू अभ्यासक्रम एकूण 45 दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधी नंतर तीन चाचण्यांचा समावेश आहे.
2. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यासक्रम तुम्हाला मदत करणार आहे.
3. हा सेतू अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवावा.
4. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतिपत्रिकांचा समावेश आहे. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृतिपत्रिका स्वप्रयत्नाने सोडवाव्यात.
5. कृतिपत्रिका सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या.
6. प्रत्येक कृतिपत्रिकेत दिलेला पाठ्यांश अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी व्हिडीओ लिंक दिल्या आहेत, त्यांचा उपयोग करून संकल्पना समजून घ्या.
7. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या. शेवटी दिलेल्या उत्तरसूचीच्या मदतीने आपल्या उत्तरांची खात्री करा.
8. न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

शिक्षक / पालकांसाठी सूचना

Covid-19 च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात ही शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.**

1. सेतू अभ्यासक्रम एकूण 45 दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
2. सेतू अभ्यासक्रम हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
3. सदर अभ्यासक्रम हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
4. सदर अभ्यासक्रमात घटक व उपघटकनिहाय कृतिपत्रिकांचा (वर्कशीट) समावेश आहे. कृतिपत्रिका या अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आल्या आहेत.
5. कृतिपत्रिका या सामान्यपणे सहा भागांत देलेल्या आहेत. इयत्तानिहाय त्यात थोडाफार फरक आढळून येईल.

   पहिला भाग -अध्ययन निष्पत्ती- विद्यार्थी नेमके काय शिकणार आहे. दुसरा भाग- थोड समजून घेऊ - संकल्पनांचे स्पष्टीकरण

   तिसरा भाग - चला सराव करू - सरावासाठी उदाहरणे

   चौथा भाग – सोडवून पाहू - विद्यार्थ्यांना संकल्पना समजली की नाही हे पाहण्यासाठी प्रश्न / कृती / स्वाध्याय.

   पाचवा भाग - थोडी मदत - संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून व्हिडीओ लिंक, क्यु आर कोड इत्यादीचा समावेश.

   सहावा भाग - हे मला समजले – विद्यार्थ्यांनी स्वयंमूल्यांकन करावे यासाठी अध्ययन निष्पत्ती दर्शक विधाने.
6. मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
7. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यासक्रम दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.






8. विद्यार्थी प्रत्येक कृतिपत्रिका (वर्कशीट) स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मदत करावी.
9. निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
10. चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course): शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस –१/ कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	१. इतिहासलेखन : पाश्चात्य परंपरा २. इतिहासलेखन : भारतीय परंपरा	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	१.भारतीय इतिहासातील विविध कालखंडाचा चिकित्सक, तुलनात्मक अभ्यास करता येणे. २.इतिहास हा शास्त्रशुद्ध अभ्यासविषय आहे हे सांगता येणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	१.इतिहासाची साधने	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	१.ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण करता येणे. २.ऐतिहासिक वस्तू, कागदपत्रे, पुस्तके, नाणी व इलेक्ट्रॉनिक माहिती गोळा करून संग्रह करता येणे. तसेच त्यांचे वर्गीकरण वेगवेगळ्या पद्धतीने करता येणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवूया	सांगा पाहू १.इतिहास म्हणजे काय ? २.मागील इयत्ता मध्ये आपण इतिहासात कोणत्या काळाचा अभ्यास केला? ३.इतिहासाची माहिती कशावरून मिळते ? ४.इतिहासाच्या साधनाचे प्रकार सांगा.
	मदत हवी का ?	१. दीक्षा ॲप लिंक - http://tiny.cc/wj0eqz २. वाचन करा व माहिती जाणून घ्या.      
	कृती करा	१.  खालील साधनांचे भौतिक, लिखित व मौखिक साधने यांत वर्गीकरण करा. ताम्रपट, लोककथा, मातीची भांडी, मणी, प्रवासवर्णने, ओवी, शिलालेख, पोवाडा, वैदिक साहित्य, स्तूप, नाणी, भजन, पुराणग्रंथ. भौतिक साधने | लिखित साधने | मौखिक साधने ----- | ----- | ----- ----- | ----- | ----- ----- | ----- | ----- २.  खालील चौकोनात दडलेली ऐतिहासिक साधनांची नावे शोधून लिहा. ता दं त क था चं री प्र चि त्रे रि च ख क प ड लो ख ब ज्ञा श्लो ट क ति आ पो वा डे गी ते शि ला ले ख ते र

		३. तुम्ही भेट दिलेल्या ऐतिहासिक स्थळाची माहिती लिहा. ४. तुम्हाला सापडलेल्या नाण्याची माहिती लिहा
शैक्षणिक साहित्य	ऐतिहासिक साधनांचे तक्के, विविध वस्तू, पुस्तके, ग्रंथ, चित्रे, वृत्तपत्रे, मोबाईल, टपाल तिकिटे, नियतकालिके, नाणी-नोटा	
काय समजले ?	ऐतिहासिक साधनांचे प्रकार किती आहेत ? साधनांवरून प्रकार कसे पडतात? साधनांचे भौतिक,लिखित व मौखिक साधनाशिवाय अन्य कोणत्या प्रकारे वर्गीकरण करू शकाल?	
अधिक माहिती	दीक्षा ॲप लिंक - http://tiny.cc/wj0eqz, ऐतिहासिक साधने इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक	
स्वाध्याय व मूल्यमापन	१. इतिहासाच्या साधनांमध्ये विविध कालखंडात कोणता बदल झाला ? २. इतिहास शास्त्र आहे असे का वाटते ?	
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. तुम्ही भेट दिलेल्या ऐतिहासिक स्थळाची माहिती लिहा. यासाठी कोणत्या साधनांचा आपण उपयोग केला आहे ? २. नजीकच्या काळात जवळच्या संग्रहालयास, अभिलेखागारास भेट द्या.	


राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – २ / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	१ . इतिहासलेखन : पाश्चात्य परंपरा २. इतिहासलेखन : भारतीय परंपरा	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	भारतीय इतिहासातील विविध कालखंडाचा चिकित्सक, तुलनात्मक अभ्यास करता येणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	१ . इतिहासाची साधने	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासात तत्कालीन घटनांची कल्पना करता येणे व अंदाज बांधता येणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवू या	१. टपाल खात्याने टपाल तिकिटावर कोणकोणत्या प्रकारच्या प्रतिमा चित्रित केलेल्या आपण पाहिलेल्या आहेत ? २. रोजची माहिती देणाऱ्या साधनांत कोणत्या साधनांचा समावेश करता येईल ? ३. भारताच्या शेजारील राष्ट्रांची नावे सांगा.
	मदत हवी का ?	१. इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक. २. भारताचा नकाशा ३. लिंक पहा टपाल तिकीटे - **https://diksha.gov.in/get/dial/EPC4CN** 
	कृती करा	दिलेले चित्र पहा या संस्थेत कोणते कार्य चालत असावे ?  छ.शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय  ग्रंथालय  एफटीआयआयचे बोधचिन्ह
शैक्षणिक साहित्य	भारताचा नकाशा, चित्रे,	

काय समजले ?	१. ऐतिहासिक साधनांच्यावरून कोणकोणत्या गोष्टीची कल्पना येऊ शकते ? २. व्यक्त केलेल्या अंदाजाविषयी सत्यता, यथार्थता तपासून घेण्यासाठी अन्य कोणकोणत्या संदर्भ साधनांचा अभ्यास उपयुक्त ठरू शकतो?
अधिक माहिती	१. इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक. २. लिंक पहा टपाल तिकीटे – **https://diksha.gov.in/get/dial/EPC4CN**
स्वाध्याय व मूल्यमापन	१. अभिलेखागार मध्ये कोणत्या ऐतिहासिक साधनाचे जतन होते ? २. तुम्हास माहित असलेल्या संग्रहालयाची नावे सांगा. ३. वर्तमानपत्रात कोणकोणत्या प्रकारचे वृत्त छापले जातात ? ४. ऐतिहासिक साधनांचे जतन करण्याचे कार्य कोणकोणत्या संस्था मधून होते ?
अधिक सराव / कृती/ उपक्रम	सोबत दिलेल्या चित्रावरून तत्कालीन घटनाची कल्पना करा व आपले मत लिहा. १.  २. 

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 03**

कृती क्रमांक : 01 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** भौगोलिक साधनांचा उपयोग करुन विविध स्थळे व प्रदेश शोधता येणे. स्थापित करता येणे व अहवाल तयार करता येणे.

❖ **क्षेत्र :** प्रात्यक्षिक भूगोल .

❖ **घटक :** भौगोलिक क्षेत्रभेट.

❖ **थोडे आठवूया :**

1) विद्यार्थी मित्रांनो तूम्ही कधी सहलीला गेलात का ? :.....

2) गेला असाल तर कोणासोबत सहलीला गेला होतात : आई–वडिल / मित्र–मैत्रिणी / शिक्षक

3) आई वडील आणि शिक्षक यांच्या सोबत सहलीला जाण्यात कोणता फरक आहे ? .....

4) तुम्ही कोणकोणते साहित्य सोबत नेले ? :.....

❖ **कृतीचे नाव :** नियोजित क्षेत्रभेटीसाठी लागणारे आवश्यक साहित्यांची यादी तयार करणे व अहवाल लेखन

❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** नकाशा, नकाशा आराखडा, पेन, पेन्सिल, खोडरबर, मोजपट्टी,कागद, मोबाइल, इतर साहित्य.

❖ अ) खालील चित्रांचे निरीक्षण करुन योग्य ठिकाणी नावे दया.



ब) खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे तुम्ही भेट दिलेल्या कोणत्याही एका ठिकाणाचे अहवाल लेखन करा.

नैसर्गिक प्रदेशाची भेट अहवाल लेखन

1. प्रस्तावना 2. ठिकाणाचे नाव 3 स्थान 4 प्रवासाचा मार्ग व .प्रवासाचे साधन 5. प्राक्तिक घटक 6. हवामान 7.लोकसंख्या 8. पर्यावरणीय समस्या व उपाय 9. भूमी उपयोजन 10. निष्कर्ष 11. तुमचे मत नोंदवा

किंवा

कारखाना भेट अहवाल अहवाल लेखन

1. प्रस्तावना 2. कारखान्याचे नाव 3. स्थान 4. प्रवासचा मार्ग व प्रवासाचे साधन 6. कारखान्यात उत्पादन होणाऱ्या मालाचे नाव 7. कच्चामाल कोठून येतो 8. पक्का माल कोठे विकला जातो 9. कामगारांची संख्या 10. कामगारांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा 11. इतर घटक 12. तुमचे मत नोंदवा.

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. दिशादर्शकाचा उपयोग सांगा. :.....
   .....
2. क्षेत्रभेट अभ्यासाचे महत्व स्पष्ट करा. :.....

   ए.....
   .
   .....

अधिक माहिती येथून मिळेल : दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता सहावी,आठवी, नववी,दहावी पाठयपुस्तक. https://tinyurl.com/y3kn7khu https://tinyurl.com/ya9swd4x

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 04**

कृती क्रमांक : 02 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** भौगोलिक साधनांचा उपयोग करुन विविध स्थळे व प्रदेश शोधता येणे. स्थापित करता येणे व अहवाल तयार करता येणे.

❖ **क्षेत्र :** प्रात्यक्षिक भूगोल .

❖ **घटक :** भौगोलिक क्षेत्रभेट.

❖ **थोडे आठवूया :**

1) विद्यार्थी मित्रांनो तूम्हीला क्षेत्रभेटीस जाण्यास आवडते का ? :.....

2) तुम्ही भेट दिलेल्या स्थळांची नावे लिहा :.....

3) तुम्ही नियोजित क्षेत्रभेटीचे नियोजन कशा पध्दतीने कराल ? :.....

.....

4) तुम्ही कोणकोणते साहित्य सोबत नेले ? :.....

❖ **कृतीचे नाव :** नियोजित क्षेत्रभेट मार्गाचा नकाशा आराखडा व प्रश्नावली तयार करणे.

❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** नकाशा, नकाशा आराखडा, पेन, पेन्सिल, खोडरबर, मोजपट्टी, कागद, मोबाइल, इतर साहित्य.

तुम्ही केलेल्या क्षेत्रभेटीचा नकाशा आराखडा तयार करा.

क्षेत्रभेट मार्गाचा नकाशा आराखडा

समुद्रकिनारा /नदी किनारी प्रदेश /वन प्रदेश / ग्राम पंचायत कार्यालय/ कारखाना भेट देण्यासाठी नमुना प्रश्नावली तयार करा.

1. .....
2. .....
3. .....
4. .....
5. .....
6. .....
7. .....
8. .....
9. .....
10. .....
11. .....
12. .....
13. .....
14. .....
15. .....
16. .....

❖ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. नियोजित क्षेत्रभेट मार्गाच्या नकाशा आराखडयाचे महत्व सांगा.

   .....

   .....

   .....

2. क्षेत्रभेटी नियोजनात वाहतूक मार्ग व वाहतूक साधनांचा विचार करणे महत्वाचे का असते ?

   .....

   .....

   .....

अधिक माहिती येथून मिळेल : दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता सहावी,आठवी, नववी,दहावी पाठयपुस्तक, https://tinyurl.com/y3kn7khu

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 05**

कृती क्रमांक : 03 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** भौगोलिक साधनांचा उपयोग करुन विविध स्थळे व प्रदेश शोधता येणे. स्थापित करता येणे व अहवाल तयार करता येणे.

❖ **क्षेत्र :** प्रात्यक्षिक भूगोल .

❖ **घटक :** भौगोलिक क्षेत्रभेट.

❖ **थोडे आठवूया :**

1) सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण कोणकोणत्या घटकांने दाखविता येते :.....

2) आलखांचे प्रकार कोणकोणते आहेत? : .....

3) स्तंभालेख म्हणजे काय ? :.....

.....

4) रेषालेख म्हणजे काय ? :.....

.....


❖ **कृतीचे नाव :** आलेख तयार करणे व त्याखालील प्रश्नांची उत्तरे देणे.

❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** आलेख कागद, पेन, पेन्सिल, खोडरबर, मोजपट्टी, कागद, मोबाइल, संगणक, इतर साहित्य.

❖ **कृती** : खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे रेषालेख तयार करा.

वष्ज्ञ	1995	2000	2005	2010	2015
भारतातील पर्यटक संख्या लाखात	20	30	40	60	140

भारतातील आंतरराष्ट्रीय पर्यटक संख्या



❖ **वरील उदाहरणांच्या आधारे रेषालेख तयार करा व आलेखाचे निरीक्षण करुन प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. वरील आलेखात काय दर्शविण्यात आले आहे?

   .....

2. वरील आलेखात कोणत्या वर्षापासून आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्यात वाढ झाली आहे.?

   .....

3.सर्वात जास्त पर्यटकांची कोणत्या वर्षी वाढली आहे.?

   .....

4.वरील आलेखाच्या निरीक्षणावरुन तुमचे मत नोंदवा.

   .....

❖ **खालील प्रश्नांची उत्तरे दया.**

1. आलेख तयार करण्यासाठी कोणकोणत्या घटकांचा विचार करावा लागतो?

   .....

   .....

2. आलेखाचे उपयोग लिहा.

   .....

   .....

❖ **अधिक माहिती येथून मिळेल :** दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता सहावी,आठवी, नववी,दहावी पाठयपुस्तक.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस –6 / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	१. इतिहासलेखन : पाश्चात्य परंपरा २. इतिहासलेखन : भारतीय परंपरा	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	इतिहास हा शास्त्रशुद्ध अभ्यास विषय आहे हे सांगता येणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	१ . इतिहासाची साधने	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	ऐतिहासिक संदर्भाचे योग्य वाचन करून त्याचा अर्थ सांगता येणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवू या	१. टपाल तिकीट, नाणी यावरून कोणता अर्थबोध होतो ? २. कोशवाङमयातून कोणती माहिती मिळते ? ३. तुम्हाला माहित असलेली साप्ताहिके, मासिके, वार्षिके यांची नावे सांगा. ४. ऐतिहासिक ग्रंथांची नावे सांगा. ५. एखाद्या संदर्भ साधनाची विश्वसनीयता कोणत्या गोष्टीवरून ठरते ? ६. एखाद्या संदर्भ साधनाच्या वाचनावरून कोणत्या गोष्टीची माहिती मिळू शकते ?
	मदत हवी का ?	१. प्रकाशन विभाग सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार www.publicationsdivision.nic.in
	कृती करा	१. नियतकालिकांची नावे लिहा. २. लोकराज्य मासिकाचे वाचन करा यातून कोणती माहिती मिळते ? याचे प्रकाशन कोणामार्फत होते ?
शैक्षणिक साहित्य	टपाल तिकीट, नाणी, विश्वकोश खंड, वृत्तपत्र, किशोर मासिक, साधना साप्ताहिक	

काय समजले ?	१. इतिहासलेखन करताना कोणती काळजी घ्यावी ? २. वर्तमानपत्रातील येणाऱ्या बातम्याची विश्वासार्हता कशी तपासावी लागते ?
अधिक माहिती	१ . इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक. लिंक **https://diksha.gov.in/get/dial/EPC4CN**
स्वाध्याय व मूल्यमापन	१. टपाल तिकिटांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा वारसा व एकात्मता यांचे कसे जतन केले जाते ? २. तुम्ही पाहिलेल्या ऐतिहासिक चित्रपटांची यादी करा व तुम्हाला आवडलेल्या चित्रपटाचे रसग्रहण तुमच्या शब्दात करा.
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. घरातील उपलब्ध दस्तऐवजाचा (जन्म नोंद दाखले, शेती विषयक उतारे इ.) अभ्यास करा. यातून तुम्हाला कोणती माहिती मिळाली ते लिहा. २. टपाल तिकिटे व नाण्यांचा संग्रह करा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 7 / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	१ . इतिहासलेखन : पाश्चात्य परंपरा २. इतिहासलेखन : भारतीय परंपरा	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	भारतीय इतिहासातील विविध कालखंडाचा चिकित्सक, तुलनात्मक अभ्यास करता येणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	१ . इतिहासाची साधने	
सेतू बांधणी -इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	ऐतिहासिक घटनांचा अर्थ वस्तुनिष्ठ रीतीने लावता येणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवूया	१. ऐतिहासिक साधनांचा उपयोग कशासाठी केला जातो ? २. कोणती ऐतिहासिक साधने अधिक विश्वासार्ह वाटतात ? ३. एखाद्या ऐतिहासिक साधनाचा खरे-खोटेपणा कसा तपासता येईल ? ४. एखाद्या घटनेचा इतिहास लिहिण्यासाठी प्राथमिक पुरावा उपलब्ध नसल्यास कोणती साधने वापरावी लागतात ? ५. तुम्ही ऐकलेली, वाचलेली, पाहिलेली माहिती सत्य की, असत्य आहे हे कसे ओळखाल?
	मदत हवी का ?	१ . इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
	कृती करा	१. तुमच्या गावाचा इतिहास लिहिण्यासाठी कोणती साधने वापराल त्याची ऐतिहासिक साधनांच्या प्रकारानुसार यादी करा.
शैक्षणिक साहित्य	चित्रे, विविध ऐतिहासिक वस्तू, नाणी, नोटा, टपाल तिकिटे, विविध कोश, वर्तमानपत्रे, मोबाईल	
काय समजले ?	१. कोणत्या ऐतिहासिक साधनांचा उपयोग सत्य माहिती लिहिण्यास उपयुक्त ठरतो ? २. एखाद्या घटनेचा अर्थ वस्तुनिष्ठ रीतीने लावण्यासाठी कोणत्या गोष्टी तपासाव्या लागतील ?	
अधिक माहिती	ई – लोकराज्य https://dgipr.maharashtra.gov.in/lokrajya-marathi	

स्वाध्याय व मूल्यमापन	१. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया कोणते कार्य करते ? २. भारत सरकारच्या प्रकाशन विभागामार्फत प्रकाशित केलेल्या पुस्तकांची, नियतकालिकाची नावे लिहा.
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. टपाल तिकिटांचा, नाण्याचा संग्रह करून तुम्हाला मिळालेल्या माहितीचा अहवाल तयार करा. २. महाराष्ट्र शासनाच्या लोकराज्य मासिकातून येणारी माहिती वाचा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी,विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – ८ / कालावधी ३५ मिनिटे

<table>
<tr><td>क्षेत्र/ प्रकरण नाव</td><td colspan="2">३ . उपयोजित इतिहास</td></tr>
<tr><td>इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता</td><td colspan="2">ऐतिहासिक घटनांचे समकालीनत्व ओळखता येणे.</td></tr>
<tr><td>इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव</td><td colspan="2">२ . भारत : १९६० नंतरच्या घडामोडी</td></tr>
<tr><td>सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता</td><td colspan="2">भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीत ऐतिहासिक घटनांचा क्रम योग्य पद्धतीने सांगता येणे.</td></tr>
<tr><td rowspan="2">एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती</td><td>काही बाबी आठवू या</td><td>सांगा पाहू
१. स्वातंत्र्यपूर्व काळातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटना सांगा.
२. पुढील चित्र पहा व त्याचे महत्त्व सांगा

दांडी यात्रा
३. भारतातील पंतप्रधानांची नावे सांगा.
४. खालील घटना कालक्रमानुसार लावा.
१. सोव्हिएत युनियनचे विघटन झाले.
२. गोवा,दमण आणि दीव या प्रदेशाची मुक्तता झाली.
३. भारताने पोखरण येथे पहिली अणुचाचणी केली
४. लालबहादूर शास्त्रीनी “जय जवान जय किसान” ही घोषणा दिली.</td></tr>
<tr><td>मदत हवी का ?</td><td>इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक</td></tr>
</table>

	कृती करा	१. भारतातील पंतप्रधानांच्या कालखंडानुसार योग्य क्रम लावा.  अटलबिहारी वाजपेयी इंदिरा गांधी लालबहादूर शास्त्री पं. जवाहरलाल नेहरू राजीव गांधी मोरारजी देसाई इंद्रकुमार गुजराल विश्वनाथ प्रतापसिंग एच.डी.देवेगौडा चंद्रशेखर पी.व्ही.नरसिंहराव चरणसिंग २. १९८० च्या दशकातील घटना सांगा. ३. कृती करा. दशक | महत्त्वपूर्ण घटना | घटनेचा वर्तमानात झालेला बदल १९६० | १९६२ भारत आणि चीन युद्ध | ---------- १९७० | विरोधी पक्ष एकत्र येऊन जनता पक्षाचे सरकार स्थापन | ---------- १९८० | विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात सुधारणेचा प्रयत्न | ----------
शैक्षणिक साहित्य	चित्रे , तक्ते	
काय समजले ?	१. ऐतिहासिक घटना लक्षात कशा ठेवाव्यात ? त्यांचा क्रम कसा लावता येईल ? २. ऐतिहासिक घटनांचा क्रम ऐतिहासिक घटनांचे वर्गीकरण कोणत्या आधारे करता येते ? ३. भूतकाळातील विज्ञान व तंत्रज्ञानात केलेल्या सुधारणेचा वर्तमानात कोणता बदल दिसून येतो ?	
अधिक माहिती	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक	
स्वाध्याय व मूल्यमापन	१. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळात कोणते आर्थिक प्रश्न भारतासमोर होते ? २. लालबहादूर शास्त्री यांनी “जय जवान जय किसान” ही घोषणा का दिली ? ३. हरितक्रांतीचे जनक कोणास म्हणतात ? हरितक्रांतीस कोणत्या गोष्टी कारणीभूत होत्या ? ४. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळात शेती आणि सद्य स्थितीतील शेती यातील कोणते बदल तुम्हास जाणवतात ?	

अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. भारतातील प्रधानमंत्र्याची नावे लिहा व त्यांच्या कार्याची माहिती लिहा. २. स्वातंत्र्यपूर्व काळातील शेती व आधुनिक काळातील शेती यातील झालेल्या बदलाची चित्रे संग्रहीत करा.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 09**

कृती क्रमांक : 04 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** एखादया प्रदेशाच्या स्थान –विस्ताराबाबत नकाशा व प्रतिमांवर वृत्तजाळी मांडून उत्तरे देता येणे

❖ **क्षेत्र :** सामान्य भूगोल .

❖ **घटक :** आंतरराष्ट्रीय वाररेषा (मागील इयत्तेतील पूर्वज्ञान : अक्षवृत्त व रेखावृत)

❖ **थोडे आठवूया :**

1) जागतिक प्रमाणवेळ ही कोणत्या रेखावृत्तावरुन ठरवली जाते ? :.....

2) भारतीय प्रमाणवेळ ठरविणारे रेखावृत्त कोणत्या गोलार्धात आहे.?.:.....

3) भारतीय प्रमाणवेळ ही कोणत्या रेखावृत्तावरुन ठरवली जाते ? :.....

4) भारतीय प्रमाणवेळ व जागतिक प्रमाणवेळ यामध्ये किती तासाचा फरक आहे?.:.....

5) आंतरराष्ट्रीय वाररेषा कोणत्या रेखावृत्तावरुन ठरवली जाते ? :.....

❖ **कृतीचे नाव :** नकाशा निरीक्षण करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे दया.


❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** जगाचा नकाशा , पेन, पेन्सिल, मोजपट्टी, कागद,

❖ **कृती :** नकाशा निरीक्षण करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.?


❖ **खालील नकाशाचे निरीक्षण करुन प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. भारतीय प्रमाणवेळ ठरविणारे रेखावृत्त ग्रीनीच रेखावृत्ताच्या कोणत्या दिशेला आहे?
   .....
2. दिलेल्या नकाशात सुर्योदय कोणत्या रेखावृत्तावर होतो?
   :.....
3. दिलेल्या नकाशात सूर्यास्त कोणत्या रेखावृत्तावर होतो ?
   .....
4. दिलेल्या नकाशात मध्यरात्र कोणत्या रेखावृत्तावर होते ?
   .....
5. दिलेल्या नकाशात सुर्योदय ते सूर्यास्त यांच्या मध्ये किती तास आहेत?
   .....

6 दिलेल्या नकाशात मध्यान्हची वेळ कोणत्या रेखावृत्तावर आहे?
.....


आर्क्टिक महासागर
उ त्त र अ मे रि का
यु रो प
आ शि या
आ फ्रि का
द क्षि ण अ मे रि का
अ ट्लां टि क म हा सा ग र
हि दी म हा सा ग र
प्र शां त म हा सा ग र
ऑस्ट्रेलिया
अटलांटिक महासागर
ग्रीनिच रेखावृत्त (जागतिक प्रमाणवेळ)
भारतीय प्रमाणवेळ
न्यू ऑर्लिन्स
गुड मॉर्निंग
आग्रा
पाटणा, भारत
टोकियो
गुड नाइट
मध्यरात्र
सूर्योदय
मध्यान्ह
सूर्यास्त
मध्यरात्र

खालील कृती पूर्ण करा.



❖ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1.आंतरराष्ट्रीय वाररेषा ओलांडताना कोणकोणते बदल करावे लागतात ?

.....

.....

.....

2.जागतिक प्रमाणवेळ व आंतरराष्ट्रीय वाररेषा यातील फरक स्पष्ट करा?

.....

.....

.....

.....

❖ **अधिक माहिती येथून मिळेल :** दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता सहावी,आठवी, नववी, दहावी पाठयपुस्तक. https://tinyurl.com/ybqr8l4v https://tinyurl.com/y8g65zcv https://tinyurl.com/ycwf8zml https://tinyurl.com/y2czx9vq

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 10**

कृती क्रमांक : 05 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** एखादया प्रदेशाच्या स्थान –विस्ताराबाबत नकाशा व प्रतिमांवर वृत्तजाळी मांडून उत्तरे देता येणे

❖ **क्षेत्र :** सामान्य भूगोल .

❖ **घटक :** आंतरराष्ट्रीय वाररेषा (मागील इयत्तेतील पूर्वज्ञान : अक्षवृत्त व रेखावृत)

❖ **थोडे आठवूया :**

1) एकूण अक्षवृत्ताची संख्या किती आहे ? :.....

2) उत्तर गोलार्धात अक्षवृत्ताची संख्या किती आहे.?.:.....

3) सर्वात मोठया अक्षवृत्तास कोणत्या नावाने ओळखले जाते.? :.....


4) कोणत्या अक्षवृत्तास मकरवृत्त असे म्हणतात ?.:.....

5) अक्षवृत्त व रेखावृत्त यांच्यात काय फरक आहे ? :.....

❖ **कृतीचे नाव :** आकृतीला नावे दया

❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** अक्षवृत्त आणि रेखावृत्त असलेला पृथ्वी गोल, पेन,पेन्सिल, खोडरबर,

❖ **कृती :** पुढील आकृतीस योग्य ठिकाणी नावे दया.



❖ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. कर्कवृत्त व मकरवृत्त यांच्यातील साम्य व भेद लिहा.

.....

.....

.....

.....

2. दक्षिण गोलार्धातील महत्वाच्या अक्षवृत्ताविषयी माहिती लिहा.

.....

.....

.....

.....

3. 66^0 30′दक्षिण व उत्तर अक्षवृत्तास काय म्हणतात?

.....

.....


4.तिरप्या सुर्यकिरणांच्या मर्यादा कोणत्या अक्षवृत्तापर्यंत असतात?

.....

.....

❖ **अधिक माहिती येथून मिळेल :** दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता सहावी,आठवी, नववी, दहावी पाठयपुस्तक.https://tinyurl.com/ybqr8l4v https://tinyurl.com/y8g65zcv https://tinyurl.com/ycwf8zml https://tinyurl.com/y2czx9vg

सराव नकाशा :



वरील नकाशात पुढील घटक दाखवा : भारत, विषुववृत्त,कर्कवृत्त, मकरवृत्त, ग्रीनलॅंड, अटलांटिक महासागर, चीन, हिंदी महासागर, दक्षिण अमेरिका, युरोप,

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 11**

कृती क्रमांक : 06 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** एखादया प्रदेशाच्या स्थान –विस्ताराबाबत नकाशा व प्रतिमांवर वृत्तजाळी मांडून उत्तरे देता येणे

❖ **क्षेत्र :** सामान्य भूगोल .

❖ **घटक :** आंतरराष्ट्रीय वाररेषा (मागील इयत्तेतील पूर्वज्ञान : अक्षवृत्त व रेखावृत्त)

❖ **थोडे आठवूया :**

1) विद्यार्थी मित्रांनो आपण कोणत्या देशात राहतो ? :.....

2) भारत हा देश कोणत्या गोलार्धात आहे ?.:.....


3) भारत हा देश कोणत्या खंडात आहे? :.....

4) भारतातील लोकप्रिय खेळ कोणता ?.:.....

❖ **कृतीचे नाव :** नकाशा निरीक्षण करुन भारताचे स्थान व विस्तार सांगणे.

❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** भारताचे स्थान व विस्तार दर्शविणारा नकाशा, पेन,पेन्सिल, खोडरबर,

❖ **कृती :** भारताच्या नकाशाचे निरीक्षण करुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा



प्रश्न : 1.भारताचा अक्षवृत्तीय विस्तार लिहा.

.....

2.भारताचे पुर्व पश्चिम अंतर किती किमी आहे?

.....

3.भारताचा रेखावृत्तीय विस्तार लिहा.

.....

4.भारताचे उत्तर दक्षिण अंतर किती किमी आहे?

.....

. 5.भारताची प्रमाणवेळ कोणत्या रेखावृत्तावरुन ठरविली आहे ?

.....

6.इंदिरा पॉईट ठिकाण किती अक्षवृत्तावर आहे.?

.....

7.भारताच्या मध्ये भागातून कोणते अक्षवृत्त गेले आहे?

.....

8. भारताच्या वायव्येकडे असलेल्या देशाचे नाव लिहा.

.....

9.नेपाळला भारताच्या किती बाजूनी सीमा आहेत ?

.....

. 10. भारताने तिन्ही बाजूनी वेढलेल्या देशांची नावे लिहा.

.....


❖ **अधिक माहिती येथून मिळेल :** दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता सहावी, आठवी, दहावी पाठयपुस्तक

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे


सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 12 / कालावधी ३५ मिनिटे

<table>
<tr><td>क्षेत्र/ प्रकरण नाव</td><td colspan="2">५. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने (राज्यशास्त्र)</td></tr>
<tr><td>इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता</td><td colspan="2">१.विविध आव्हानांचे वस्तुनिष्ठ स्वरूप स्पष्ट करता येणे.
२.अंतर्गत आव्हानांना तोंड कसे देता येते याचे विवेचन करता येणे</td></tr>
<tr><td>इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव</td><td colspan="2">३. भारतापुढील अंतर्गत आव्हाने</td></tr>
<tr><td>सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता</td><td colspan="2">भारतासमोरील अंतर्गत आव्हानांचा चिकित्सक अभ्यास करता येणे.</td></tr>
<tr><td rowspan="3">एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती</td><td>काही बाबी आठवूया</td><td>१. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतासमोर कोणती आव्हाने होती ?
२. भारतासमोरील व्यक्तीस्वातंत्र्य विषयी कोणती आव्हाने तुम्हाला जाणवतात ?
३. भारतासमोरील विषमतेची आव्हाने कोणती ?
४. भारतासमोर जनतेच्या शासनातील सहभागाविषयी कोणती आव्हाने आहेत ?
५. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतासमोर कोणती आव्हाने आहेत ?</td></tr>
<tr><td>मदत हवी का ?</td><td>इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक</td></tr>
<tr><td>कृती करा</td><td>१. पंजाब मधील असंतोष या आधारे पुढील कालरेषेवर पूर्ण करा.


२. भारतातील विकसित व अविकसित प्रदेश पुढील तक्यात दर्शवा.
आसाम, महाराष्ट्र, ओडिशा,गुजरात, पंजाब, बिहार,तामिळनाडू.
<table>
<tr><td>विकसित प्रदेश</td><td>अविकसित प्रदेश</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
</table>

शैक्षणिक साहित्य	भारताचा नकाशा
काय समजले ?	१. भारतासमोर कोणकोणती अंतर्गत आव्हाने आहेत ? २. आव्हाने का निर्माण होतात ? ३. आव्हाने कोणकोणत्या प्रकारची असू शकतात ? ४. आव्हानाचा विकासावर कोणता परिणाम होतो ? ५. आव्हानांचे निराकरण कसे करता येते ?
अधिक माहिती	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
स्वाध्याय व मूल्यमापन	१. नक्षलवाद म्हणजे काय ? २. भारतातील नक्षलवादी क्षेत्रे कोणती ? ३. जमातावादाचा कोणता परिणाम होतो ?
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. प्रदेशवाद म्हणजे काय ते सांगून त्याचा देशावर कोणता परिणाम होतो ? २. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा. 


राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 13 / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	४. सामाजिक व राजकीय चळवळी (राज्यशास्त्र)	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	शेतकरी व कामगारांच्या मागण्यांची माहिती करून घेणे	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	४. आर्थिक विकास	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	भारतातील आर्थिक धोरणे काळानुसार बदलत गेली हे स्पष्ट करता येणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवूया	१. प्राचीन व मध्ययुगीन काळात भारताचा व्यापार कोणकोणत्या देशांशी होत असे ? २. इंग्रजी राजवटीत भारतीयांचे आर्थिक शोषण इंग्रजांनी कसे केले ? त्याचा भारतीयांच्यावर कोणता परिणाम झाला ? ३. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताने कोणत्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे ?
	मदत हवी का ?	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
	कृती करा	१. भारताने आर्थिक विकास होण्यासाठी कोणत्या गोष्टी केल्या ? २. भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार का केला ? ३. संकल्पना चित्र पूर्ण करा. / तक्ता पूर्ण करा



तक्ता पूर्ण करा

पंचवार्षिक योजना	कालावधी	उद्दिष्टे
पहिली	------	शेती, सामाजिक विकास
दुसरी	१९५६-१९६१	औद्योगिकीकरण
तिसरी	------	विषमतेचे निर्मुलन, रोजगार संधी विस्तार, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ
------	१९६९-१९७४	शास्त्रीय संशोधन, आरोग्य व कुटुंबनियोजन
पाचवी	------	------

शैक्षणिक साहित्य	तक्ता- मिश्र अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना
काय समजले ?	१. आर्थिक धोरणावर कोणत्या गोष्टीचा परिणाम होतो ? २. पंचवार्षिक योजना का आखण्यात आली ? ३. पंचवार्षिक योजनेत कोणते बदल होत गेले ?
अधिक माहिती	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
स्वाध्याय व मूल्यमापन	१. बँकाचे राष्ट्रीयीकरण का करण्यात आले ? २. वीस कलमी कार्यक्रमातील तरतुदी लिहा. ३. इतर क्षेत्रातील आर्थिक परिस्थितीचा कोणता परिणाम कामगार वर्गावर झाला ?
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. राष्ट्रीयकृत बँकांची नावे लिहा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 14 / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	८. पर्यटन आणि इतिहास	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	पर्यटन अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते हे जाणणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	२. भारत : १९६० नंतरच्या घडामोडी ४. आर्थिक विकास	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	१.जागतिकीकरणामुळे आलेल्या आर्थिक सुधारणांच्या परिणामाचा आढावा घेता येणे. २.खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांची कारणमीमांसा करता येणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	**काही बाबी आठवू या**	१. भारताने पंचवार्षिक योजनेचा स्वीकार केल्याने अर्थव्यवस्थेत कोणता बदल झाला ? २. मिश्र अर्थव्यवस्थेचा भारताने स्वीकार केल्याने अर्थव्यवस्थेत कोणते चांगले परिणाम दिसून आले ? ३. जागतिकीकरणामुळे कोणकोणत्या क्षेत्रात बदल झाला ? ४. खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण म्हणजे काय ?
	मदत हवी का ?	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
	कृती करा	१. आर्थिक उदारीकरण कशास म्हणतात ? २. १९९१ च्या आर्थिक सुधारणांचा कोणता परिणाम भारतावर झाला ? ३. जागतिक व्यापार संघटनेचा भारत सदस्य झाल्यानंतर भारतात कोणत्या सुधारणा झाल्या ? ४. WTO या संघटनेचे बोधचिन्ह, सदस्य देश, उद्दिष्टे, कार्यक्रम इत्यादी माहिती इंटरनेटच्या मदतीने मिळवा ५. जागतिकीकरणाचा पर्यटनावर कोणता परिणाम झाला ?

शैक्षणिक साहित्य	मोबाईल
काय समजले ?	१. जागतिकीकरणाचे फायदे व तोटे सांगा. २. आज कोणत्या क्षेत्राचे खासगीकरण होत आहे ?
अधिक माहिती	१. इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
स्वाध्याय व मूल्यमापन	१. जागतिककरणाचा शेतीच्या क्षेत्रावर कोणता परिणाम झाला ? २. जागतिकीकरणामुळे औद्योगिक क्षेत्रात कोणता बदल झाला ?
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. आधुनिक भारताच्या इतिहासात १९९१ हे साल महत्त्वाचे का ठरते ? २. नजकीच्या काळात राष्ट्रीय बँकेस/ शाखेस भेट देऊन त्यांच्या कामकाजाची माहिती मिळवा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

चाचणी क्रमांक १ **दिवस १५**

वेळ ३० मि. गुण

१५

प्रश्न १ अ) पुढील विधानासाठी दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्यायाचे वर्णाक्षर चौकटीत लिहा. ३

१) आधुनिक कालखंडातील..... लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. | |

अ) कायदेमंडळ ब) वृत्तपत्रे क) न्यायमंडळ ड) कार्यकारी मंडळ

२) भारतीय हरितक्रांतीचे जनक .....होत. | |

अ) डॉ.वर्गीस कुरीयन ब) डॉ.होमी भाभा क) डॉ.एम.एस.स्वामिनाथन ड) डॉ.नॉमेन बोरलॉग

३) वीस कलमी कार्यक्रमाची ---------- यांनी घोषणा केली. | |

अ) पं.नेहरू ब) लालबहादूर शास्त्री क) इंदिरा गांधी ड) पी.व्ही.नरसिंहराव

ब) पुढील गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा २

१) अ) लिखित साधन – वृत्तपत्रे
ब) मौखिक साधन – लोकगीते
क) भौतिक साधन – चित्रपट
ड) दृक-श्राव्य साधन – आंतरजाल

---

२) अ) विश्वनाथ प्रताप सिंग – इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण
ब) राजीव गांधी – विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक सुधारणा
क) अटलबिहारी वाजपेयी– हरितक्रांतीचे जनक
ड) पी.व्ही.नरसिंहराव – भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक बदल घडवून आणले.

प्रश्न २ सूचनेप्रमाणे कृती करा . ४

१) खाली दिलेल्या भारतातील पंतप्रधानांचा कालखंडानुसार योग्य क्रम लावा.

एच.डी.देवेगौडा, राजीव गांधी, पी.व्ही.नरसिंहराव, अटलबिहारी वाजपेयी

१. ----------

२. ----------

३. ----------

४. ----------

२) खाली दिलेल्या प्रदेशातील विकसित व अविकसित प्रदेश पुढील तक्यात दर्शवा.

आसाम, महाराष्ट्र, ओडिशा,गुजरात, पंजाब, बिहार,तामिळनाडू.

विकसित प्रदेश	अविकसित प्रदेश

प्रश्न ३ पुढील प्रश्नाचे २५ ते ३० शब्दात उत्तर लिहा. (कोणतेही दोन) ४

१) 'आनंदपूर साहिब' या ठरावात अकाली दलाने कोणत्या मागण्या केल्या ?

२) भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

३) वर्तमानपत्रात कोणकोणत्या प्रकारचे वृत्त छापले जातात ?

प्रश्न ४ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही एक) २

१) अस्पृश्यतेच्या रूढीवर कायदयाने बंदी आणली.

२) 'ऑपरेशन ब्लू स्टार' करावे लागले.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतू अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष 2021.22

विद्यार्थी स्वंय अध्ययन चाचणी क्रमांक :01 दिवसः

इयत्ता : दहावी विषय : भूगोल वेळ : 30 मिनिटे गुण : 15

प्रश्न 1 ला. खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा. **05**

1) क्षेत्रभेटीचा अहवाल लेखन करताना.....साधनांचा उपयोग केला जातो.

1) प्रश्नावली 2) फोटो 3) नकाशा 4) दुर्बिण

अ) फक्त 1 व 4 ब) फक्त 2 व 3 क) फक्त 3 ड) फक्त 1, 2,व 3

2) क्षेत्रभेटी दरम्यान क्षणचित्रे घेण्यासाठी .....साधनांचा वापर करतात.

अ) नकाशा ब) दिशादर्शक क) दुर्बिण ड) कॅमेरा

3) भारतीय प्रमाणवेळ.....रेखावृत्तावरुन निश्चित केली आहे.

अ) $82\frac{1}{2}$ अंश उत्तर अक्षवृत्त ब)$82\frac{1}{2}$ अंश दक्षिण अक्षवृत्त

क) $82\frac{1}{2}$ अंश पूर्व रेखावृत्त क)$82\frac{1}{2}$ अंश पश्चिम अक्षवृत्त

4) आंतरराष्ट्रीय वाररेषा.....रेखावृत्तावरुन ठरविली जाते.

अ) 180^0 ब) 0^0 क) 60^0 ड) 90^0

5) भारत हा .....गोलार्धातील देश आहे.

अ) उत्तर–पूर्व ब) उत्तर–पश्चिम क) दक्षिण–पूर्व ड) दक्षिण–पश्चिम

प्रश्न 2 रा.योग्य जोडया लावा. **05**

अ गट	उत्तरे	ब गट
1. दिशादर्शक	( )	अ. $23\frac{1}{2}$ अंश उत्तर अक्षवृत्त
2. कर्कवृत्त	( )	ब. जागतिक प्रमाणवेळ
3. ग्रीनीच रेखावृत्त	( )	क. माहिती मिळविण्याचे साधन
4. 0^0 चे अक्षवृत्त	( )	ड. दिशा ओळखण्यासाठी
5. प्रश्नावली	( )	ई. मकरवृत्त
		फ. विषुववृत्त

प्रश्न 3 रा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. **02**

1) क्षेत्रभेटी दरम्यान प्रश्नावलीचे महत्त्व विशद करा.

.....

2) जागतिक प्रमाणवेळ किती अंशाच्या रेखावृत्तावरुन ठरविली जाते?

.....

प्रश्न 4 था : जगाच्या नकाशात विषुववृत्त, मकरवृत्त, कर्कवृत्त दाखवा योग्य ठिकाणी नावे दया.? **03**

जगाचा नकाशा
(पाठय पुस्तकातील किंवा कृतीत दिलेला नकाशा वापरा.)

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 16**

कृती क्रमांक : 07 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** भौगोलिक घटकांचे निरीक्षण करणे,अनुमान काढणे.

❖ **क्षेत्र :** प्राकृतिक भूगोल

❖ **घटक :** अंतर्गत हालचाली व बाहयप्रक्रिया

❖ **थोडे आठवूया :**

1) भूकंप म्हणजे काय ? :.....

2) भूकंपामूळे का परिणाम होतात ?.:.....

3) वली पर्वत म्हणजे काय?.....

4) बाहयप्रक्रियेत कोणकोणत्या क्रियांचा समावेश होतो?.:.....




❖ **कृतीचे नाव :** भौगोलिक आकृत्यांचे निरीक्षण करणे व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देणे.


❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** अंतर्गत हालचाली व बाहयप्रक्रिया यांच्या भौगोलिक आकृत्या


❖ **कृती :** भौगोलिक आकृत्याचे निरीक्षण करुन प्रश्नांची उत्तरे लिहा.


भूकंप लहरींचे प्रकार





परिणाम	दाब	ताण
लहरींच्या हालचालींची दिशा	एकमेकांकडे येणाऱ्या लहरी	एकमेकांविरुद्ध जाणाऱ्या लहरी
कठीण खडकांवर होणारा परिणाम		
मृदू खडकांवर होणारा परिणाम		














प्रश्न : 1.भूकंप लहरीचे प्रकार लिहा.

.....

2.भूकंपनाभी व अपिकेंद्र यातील फरक लिहा.

.....

3.भू अंतर्गत हालचाली एकमेकाच्या विरुध्द बाजूने होत असतील तर त्यामुळे भूपृष्ठावर काय परिणाम होतो ?

.....

.....

4.गट पर्वत व खचदरी यांच्यातील फरक स्पष्ट करा.

.....

.....

.....

5.पूरतट व पूरमैदान ही भूरुपे नदीच्या कोणत्या कार्यामूळे तयार होतात.

.....

6.हिमोढाचे प्रकार लिहा. :.....

.....

7. मध्य हिमोढ हिमनदीच्या कोणत्या भागात असतात ?

.....

.. 8. सागरी लाटांच्या खनन कार्यामूळे कोणकोणते भूरुपे तयार होतात ?

.....

.....

9. पुळण हे भूरुप कोणत्या बाहयकार्याच्या संचयन कार्यामुळे तयार होते ?

.....

10.वलीकरणामुळे कोणते भूरुप तयार होते?

.....

अधिक माहिती येथून मिळेल : दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता नववी पाठयपुस्तक https://tinyurl.com/y9taj7wm https://tinyurl.com/yc6m2enh https://tinyurl.com/yd2ktym9

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 17**

कृती क्रमांक : 08 **अध्ययन क्षमता वर्ग : नववा**

❖ **अध्ययन क्षमता :** भौगोलिक घटकांचे निरीक्षण करणे,अनुमान काढणे.

❖ **क्षेत्र :** प्राकृतिक भूगोल

❖ **घटक :** अंतर्गत हालचाली व बाहयप्रक्रिया

❖ **थोडे आठवूया :**

1) भारताच्या उत्तर भागातील पर्वताचे नाव काय आहे ?

:.....

2) भारतीय वाळवंट भारताच्या कोणत्या दिशेला आहे ?

:.....

3) बंगालचा उपसागर भारताच्या कोणत्या दिशेला आहे ?


.....


4) भारतातील सर्वात उंचशिखराचे कोणते आहे ?

:.....

❖ **कृतीचे नाव :** प्राकृतिक घटकांचे निरीक्षण करणे

❖ **कृतीसाठी आवश्यक साहित्य :** विविध भूरुपे, भारताचा प्राकृतिक नकाशा





❖ **कृती :** विविध भूरुपे, भारताच्या प्राकृतिक नकाशाचे निरीक्षण करुन प्रश्नांची उत्तरे लिहा.

प्रश्न : 1. भारतातील 6000 मीटरपेक्षा जास्त उंची असलेला भाग कोणत्या दिशेस आहे?

.....

2.द्वीपकल्पावरील पूर्ववाहिनी नदयांची नांवे लिहा.?

.....

3.सहयाद्री पर्वताची उंची कोणत्या दिशेने वाढत जाते?

.....

4. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाचा उतार कोणत्या दिशेला आहे ?

.....

5.पूर्व घाटातील शिखरांचे नाव सांगा.

.....

❖ **अधिक माहिती येथून मिळेल :** दिक्षा ॲप, नकाशासंग्रह, मोबाईल, संगणक, इयत्ता नववी दहावी पाठयपुस्तक. नवनीत शालेय ॲटलास.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 18 / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	४. सामाजिक व राजकीय चळवळी (राज्यशास्त्र)	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	सामाजिक चळवळी जनजागृतीसाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करतात हे ओळखता येणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	५. शैक्षणिक वाटचाल ६. महिला व अन्य दुर्बल घटकांचे सक्षमीकरण	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	विविध सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवूया	१. स्वातंत्र्यपूर्व काळात कोणत्या सामाजिक समस्या होत्या ? २. मुलींसाठी पहिली शाळा कोणी सुरु केली ? ३. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कोणकोणत्या समाजसुधारकांनी कार्य केले ?
	मदत हवी का ?	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
	कृती करा	१. आदिवासी मुलांसाठी ताराबाई मोडक व अनुताई वाघ यांनी कोणते कार्य केले ? २. शासनाने महिला व अन्य दुर्बल घटकांचे, अल्पसंख्याक यांचे सक्षमीकरण होण्यासाठी शिक्षण क्षेत्रात कोणते उपाय योजले ? ३. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी शासनाने कोणत्या सुधारणा केल्या ? ४. संकल्पना चित्र पूर्ण करा. 

शैक्षणिक साहित्य	शैक्षणिक क्षेत्रात कार्य केलेल्या थोर व्यक्तींची चित्रे
काय समजले ?	१. शिक्षणातून कोणत्या सामाजिक समस्या सोडविण्यास मदत झाली ?
अधिक माहिती	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
स्वाध्याय व मूल्यमापन	१. कोठारी आयोगाने शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा होण्यासाठी कोणत्या शिफारशी केल्या ? २. मुक्त विद्यापीठ कार्याची माहिती लिहा.
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. महाराष्ट्र राज्य संपूर्ण साक्षर होण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा लागेल ? २. कोसबाडच्या प्रकल्पाविषयी माहिती लिहा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 19 / कालावधी ३५ मिनिटे

<table>
<tr><td>क्षेत्र/ प्रकरण नाव</td><td colspan="2">४. सामाजिक व राजकीय चळवळी (राज्यशास्त्र)</td></tr>
<tr><td>इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता</td><td colspan="2">महिला व अन्य दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणाचा अर्थ सांगता येणे</td></tr>
<tr><td>इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव</td><td colspan="2">६. महिला व अन्य दुर्बल घटकांचे सक्षमीकरण</td></tr>
<tr><td>सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता</td><td colspan="2">समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठीचे विविध प्रयत्न व त्यांचे महत्त्व ओळखणे.</td></tr>
<tr><td rowspan="3">एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती</td><td>काही बाबी आठवूया</td><td>१. विकासापासून वंचित असणारे समाजातील घटक कोणते ?
२. विकासापासून वंचित असणाऱ्या घटकांच्या विकासासाठी कोणते प्रयत्न करावेत असे तुम्हाला वाटते ?
३. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असणाऱ्या महिलांची नावे सांगा.</td></tr>
<tr><td>मदत हवी का ?</td><td>इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक</td></tr>
<tr><td>कृती करा</td><td>१. खालील तक्ता पूर्ण करा.
<table>
<tr><th>क्र.</th><th>क्षेत्र</th><th>महिलेचे नाव</th><th>उल्लेखनीय कामगिरी</th></tr>
<tr><td>१</td><td>सामाजिक</td><td>मृणाल गोरे</td><td>महागाई विरोधी आंदोलन</td></tr>
<tr><td>२</td><td>शिक्षण</td><td>--------</td><td>----------</td></tr>
<tr><td>३</td><td>क्रीडा</td><td>--------</td><td>----------</td></tr>
<tr><td>४</td><td>राजकीय</td><td>--------</td><td>----------</td></tr>
<tr><td>५</td><td>विज्ञान</td><td>--------</td><td>----------</td></tr>
<tr><td>६</td><td>पर्यावरण</td><td>--------</td><td>----------</td></tr>
<tr><td>७</td><td>साहित्य</td><td>--------</td><td>----------</td></tr>
<tr><td>८</td><td>संगीत</td><td>--------</td><td>----------</td></tr>
</table>
२.स्वातंत्र्यानंतरच्या काळात स्त्रीयांचे योगदान कोणते ?
३.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती-जमाती, अल्पसंख्यांक यांच्या विकासासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले ?</td></tr>
</table>


शैक्षणिक साहित्य	विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींचे फोटो, तक्ते,
काय समजले ?	१. समाजातील दुर्बल घटक कोणते ? २. समाजातील महिला व दुर्बल घटक कोणत्या विकासापासून वंचित आहेत ? ३. समाजातील महिला व दुर्बल घटक यांच्या विकासासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ?
अधिक माहिती	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
स्वाध्याय व मूल्यमापन	१. संकल्पनाचित्र तयार करा.- महिलांच्या संदर्भातील कायदे. २. अस्पृश्यता निवारणासाठी कोणते प्रयत्न झाले ? ३. मानव अधिकार संरक्षण कायदयाविषयी माहिती लिहा.
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. कोविडचा काळ लक्षात घेता योग्य ती खबरदारी घेऊन तुमच्या गावातील महिला बचत गटाच्या कामकाजाची माहिती मिळवा. २. तुमच्या गावातील/शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांची माहिती मिळवा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

सेतू अभ्यासक्रम (Bridge Course) : शैक्षणिक वर्ष- २०२१-२२

इयत्ता – दहावी, विषय – सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र)

दिवस – 20 / कालावधी ३५ मिनिटे

क्षेत्र/ प्रकरण नाव	३. उपयोजित इतिहास	
इ.१०वी अध्ययन निष्पत्ती / क्षमता	इतिहासाचे विविध विषयात व जीवनात होणारे उपयोजन समजावून घेणे व आचरणात आणणे.	
इ.९वी इतिहास क्षेत्र/ प्रकरण नाव	७. विज्ञान व तंत्रज्ञान	
सेतू बांधणी - इ.९वी अध्ययन निष्पत्ती/ क्षमता	१.स्वातंत्र्योत्तर भारतातील विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीची उदाहरणे सांगता येणे. २.इंटरनेटच्या मदतीने नवनवीन शोधांची माहिती मिळवणे.	
एकात्मिक साध्यतेसाठी अध्ययन अनुभव /कृती	काही बाबी आठवूया	१. भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न कोणत्या प्रधानमंत्र्यानी केला ? २. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कोणती प्रगती झाली आहे ? ३. कोणता दिवस आपण विज्ञान दिन म्हणून साजरा करतो ?
	मदत हवी का ?	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक
	कृती करा	१.भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीची कालरेषा दशकानुसार तयार करा. 

		२.पुढील व्यक्तींनी विज्ञान व तंत्रज्ञानात कोणते कार्य केले ते सांगा.  डॉ. होमी भाभा डॉ. होमी सेठना डॉ.राजा रामण्णा डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम ३.इंटरनेटच्या मदतीने 'अणुऊर्जेवर आधारित विद्युतऊर्जा निर्मिती केंद्र' याची माहिती मिळवा.
शैक्षणिक साहित्य	चित्रे	
काय समजले ?	१. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने विज्ञान व तंत्रज्ञानात कोणती प्रगती केली ? २. इंटरनेटच्या वापराचे फायदे लिहा.	
अधिक माहिती	इयत्ता ९ वी इतिहास व राज्यशास्त्र क्रमिक पाठ्यपुस्तक	
स्वाध्याय व मूल्यमापन	१. इंटरनेटच्या मदतीने 'इस्त्रो ' संस्थेची माहिती मिळवा. २. मोबाईलचे फायदे व तोटे लिहा.	
अधिक सराव / कृती/ उपक्रम	१. नजीकच्या काळात संगणकाच्या सहाय्याने रेल्वे आरक्षण करून रेल्वेचा प्रवास करा व तुमच्या प्रवासाचा अनुभव लिहा. २. नजीकच्या काळात शिक्षक/ पालकांच्या मदतीने तुमच्या जवळच्या आकाशवाणी केंद्रास भेट द्या व माहिती मिळवा.	

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

सेतूअभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २०२१ – २२

विद्यार्थी अध्ययन अनुभव / कृती

इयत्ता : दहावी **विषय : भूगोल** **दिवस : 21**

